# शांताई



## कुळकथा
### शांताई वृध्दाश्रमाची



गोव्याचे माजी बांधकाम मंत्री दीपक पावसकर
आश्रमात ताण घालविण्यासाठी आजही येतात.



आश्रमातील आजी आजोबा मतदानासारखे
कर्तव्यही न चुकता निभावतात

# शांताई

दुसरे बालपण

शांताई वृध्दाश्रम

बामणवाडी-बेळगाव

दूरध्वनी : ९८४४२६८६८७

जांबोटी रोड, बामणवाडी, बेळगाव.

# कुळकथा

## *- शांताई वृध्दाश्रमाची -*

लेखन : विजय मोरे, कार्याध्यक्ष शांताई

* प्रकाशन :- १५ ऑगष्ट २०२२

अक्षर जुळवणी : यशवंत देसाई

शब्दांकन : प्रसाद प्रभू

# प्रास्ताविक

बेळगाव शहरातील एक उत्कृष्ट सेवाप्रकल्प म्हणून ''शांताई वृध्दाश्रम'' आज जनमानसात स्थानापन्न होत आहे. अनेक नव नवीन उत्साही सेवाभावी कार्यकर्ते उत्स्फूर्तपणे या सेवाकार्याशी जोडले जात आहेत, परंतु प्रकल्पाच्या उगमाविषयी खूपच थोड्यांना पूर्ण माहिती आहे. ज्या संस्थेत आपण काम करतो त्या संस्थेची पूर्वपीठीका आणि वाटचाल याची कल्पना असल्यास कार्यकर्ता अधिक उत्साहाने, आत्मियतेने आणि तळमळीने कार्यरत होऊ शकतो. यासाठी वृध्दाश्रमाचा पूर्व इतिहास मी लिहावा, अशी संकल्पना विद्यमान संचालक श्री. संतोष ममदापूर यांनी काही महिन्यापूर्वी व्यक्त केली होती.

मी सुरुवातीपासून या सेवाकार्याशी जोडलेला असल्याने आपले मनोगत व्यक्त करता येईल, असे मला वाटते. जुन्या स्मृतीना उजाळा देत वृध्दाश्रमाचा हा संक्षिप्त इतिहास शब्दबध्द करण्याचा अल्पसा प्रयत्न मी केला आहे त्यात वस्तुस्थितीचा विपर्यास होणार नाही याची काळजी घेतली आहे. त्यात कुठे आत्मश्लाधा आली असल्यास उदार अंतःकरणाने मला क्षमा करावी. घटना निवेदनाच्या अनुषंगाने काही मान्यवरांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. विस्मृतीमुळे काही सुहृदांच्या नावाचा उल्लेख करण्याचे राहून गेले असल्यास त्याबद्दल मी दिलगीर आहे.

योगायागाने माझ्याकडून गुंफली गेलेली ही शब्द कळ्यांची पुष्पमाला मी भारतमातेच्या चरणी अर्पण करीत आहे.

**- विजय पा. मोरे**

# सामाजिक सेवाकार्यासाठी शांताई ट्रस्टची स्थापना

रौप्यमहोत्सवी वर्षाकडे ''शांताई वृध्दाश्रम'' वाटचाल करत असताना त्याच्या जडण-घडणीचा इतिहास आपणासमोर मांडताना होणारा आनंद अवर्णनीय आहे.

महाद्वार रोड, बेळगाव येथील 'ज्यु. शिवाजी पार्क मंडळ' विविध सामाजिक उपक्रम आयोजित करुन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न करीत असत. अशाच एका प्रसंगी इ.स. १९९७ साली श्री. विजय पाटील एका कार्यक्रमास आले होते. मंडळ करत असलेल्या सामाजिक कार्यामुळे प्रभावित होऊन स्वतः ते मंडळाचे सदस्य झाले. त्यांच्या सक्रीय सहभागाने मंडळाच्या निरनिराळ्या विधायक सामाजिक कार्यांना शिस्तबध्द बळकटी आली. विविध उपक्रमानिमित्त होत असणाऱ्या आमच्या भेटीगाठीमुळे आमची जवळीक वाढली. आम्ही समवयस्क. एकविध समविचारसरणीमुळेही सामाजिक कार्यक्रम मोठ्या जोमात पार पाडण्यास चालना मिळाली.

समाजात असणाऱ्या वृध्दांसाठी शहरात एक वृध्दाश्रम होता. मंडळाच्यावतीने आश्रमातील आजी-आजोबांना भेटून त्यांना आवश्यक ते सामान सुमान देत असू. एक विचार मात्र अस्वस्थ करत असे तो असा की एकाच धर्मातील वृध्दांना तेथे प्रवेश असे. यामुळे श्री. विजय पाटील, मी स्वतः आणि मंडळाचे सहकारी सदस्य यांच्या विचारविनिमयाने असे ठरले की, ''सर्वधर्मसमावेषक वृध्दनागरिकांसाठी'' वृध्दाश्रम स्थापन करु. जिथे जातीपातीचा, गरीब-श्रीमंत असा भेदभाव नसेल. दैनंदिन कामकाजात त्या वृध्दांचाही यथाशक्ती सहभाग असेल. त्यामुळे आश्रमाबद्दल आपलेपणाचा भाव जागा होऊन सगळेजण एकदिलाने सहभागी होतील. आश्रमात सौहार्दपूर्ण वातावरणाचा आनंद दरवळत राहिल. वेळोवेळी आश्रमास भेटी देणाऱ्यांनाही आश्रमाचे वातावरण आदर्श वाटेल.

कामानिमित्त आम्हा दोघांचे निरनिराळ्या शहर-गावांना जाणे-येणे होत असे तेव्हा तिथे असणाऱ्या वृध्दाश्रमांना भेटी देऊन तिथल्या कामकाजाची पाहणी करणे. येणाऱ्या अडीअडचणींविषयी जाणून घेणे असा उपक्रम सुरु होता. आमच्या घरीदारीही आई-वडील व भावांच्याबरोबर साधक-बाधक चर्चासत्र सुरु होते.

अशाच एका चर्चा सत्रादरम्यान मित्रवर्य विजय पाटील यांनी त्यांच्या कुटुंबियांनी फार्म हाऊस काढण्यासाठी बामणवाडी येथे जी जागा खरेदी केलेली होती त्या जागेवर वृध्दाश्रम काढूया असे विचार व्यक्त केले. आजकाल समाजात होत असणारी वृध्दांची

परवड व केविलवाणी परिस्थिती पाटील यांचे कुटुंबियही पाहात होतेच. त्यांनाही ही कल्पना भावली व त्यांचा सकारात्मक प्रतिसादही मिळाला.

शुभस्य शिघ्रम ६ डिसेंबर १९९८ रोजी ''शांताई वृध्दाश्रम'' असे नामकरण एकविचाराने निश्चित केले. त्या वेळचे डीआयजी श्री. अरुणकुमार दत्ता, सर्वश्री. अविनाश पोतदार, रोटरीचे अध्यक्ष बाबूराव हंडे, भरमा पाटील, सौ. शांताबाई भरमा पाटील यांच्या हस्ते पायाखुदाई व पूजन करण्यात आले. अध्यक्षपदी श्री. विजय पाटील यांची निवड एकमुखाने करण्यात आली. संचालक मंडळात सर्वश्री. भाऊराव पाटील, नागेश पाटील, गजानन पाटील, राध्येश्याम बजाज, महेश महाजन, गंगाधर अरळीमट्ठी, विजय मोरे, सुकुमार रंगोळी, प्रकाश मरगाळे, राजू गवळी, मंहमद कुन्नीभावी, दिलीप जाधव, सुनील बाळेकुंद्री असे सामाजिक कार्यकर्ते होते.

संचालक मंडळाच्या स्थापनेपाठोपाठ आवश्यक बांधकाम व इतर कामकाज करुन घेण्याची जबाबदारी श्री. सुधीर मुरकुंबी यांचेकडे सोपवली. या रचनात्मक कामात त्यांना गोपाळराव कुकडोळकर यांच्या अनुभवसिध्द मदत कार्याचा सहयोग लाभला. परीणामी मी आणि सुधीर झपाटून कामाला भिडलो. बांधकामाला आकार येऊ लागला. साधासा रस्तासुध्दा नसणाऱ्या त्या माळरानावर तन-मन-धनांनी ध्येय साध्य करण्यासाठी झटत होतो. अशावेळी सर्वच काळी सर्वत्र समाजातच नांदणारी विघ्नसंतोषी जमात-खूळचट संस्कारांचे ओझे वाहत विधायक कार्यास विरोध करण्यात धन्यता मानीत होती, परंतु असल्या नकारात्मक विचारांनी नखशिखांत गच्च भरुन गेलेल्या महाभागांना भिऊन विधायक कामापासून फारकत घेण्याएवढे आम्ही लेचेपेचे नाही याची त्यांना जाणीव झाली. बांधकाम आकार घेऊ लागले.

आश्रमाच्या कामकाजाबाबत येणाऱ्या अडीअडचणीबाबत आम्ही अज्ञानीच होतो. एखाद्या अशा आश्रमाचे कामकाज कसे चालते. कोणकोणत्या कायदेशीर बाबींची पूर्तता करावी लागते याचा साधक-बाधक विचार विनिमयही कधी कोणाशी झाला नव्हता. एक ढोबळ कल्पना मनात धरुन उडी घेतली होती. त्यामुळे बांधकाम साकार होईपर्यंतच्या अवधीत आम्ही सर्वश्री. विजय पाटील, भाऊराव पाटील, नागेश पाटील, विजय मोरे, श्रीमती मारिया फर्नांडिस, पुणे येथील ''निवारा आश्रमा'चे कामकाज व व्यवस्थापन समजावून घेण्यासाठी दाखल झालो. रुग्णसेवक रमाकांत कुलकर्णी व विनायक बापट काका भेटले. आम्ही कोठून आलो? कशासाठी आलो? याची चौकशी केल्यावर आमचा हेतू ऐकून बापटकाकांनी सरळसरळ आम्हाला बाहेरचा रस्ताच दाखविला. हे

असले उद्योग करण्याचे तुमचे वय दिसत नाही, तरी कामधंदे करुन कुटुंबकबिला सांभाळायच्या मार्गाला लागा, असे म्हणत त्यांनी आम्हाला बाहेर घालवले. त्यांच्या अशा प्रकारच्या स्वागताने थोडेसे खट्टू होऊन आश्रमाबाहेरील कट्ट्यावर विसावलो होतो. तासभरानी कुलकर्णी काका बाहेर येऊन समजूत काढत बोलले, ''बापट काय सांगतो ते बरोबर आहे. तुम्ही नाराज होऊ नकात.'' तरीही नागेश पाटील यांनी विनंती केली की आम्हाला आश्रम तरी पहायला द्या. त्याचं कामकाज आम्ही पाहून घेऊ. कुलकर्णी काकांनी बापट काकांना सांगून आम्हाला आश्रम दाखवण्याची व्यवस्था केली. पाहणी करुन आभार मानून त्यांचा निरोप घेतेवेळी कुलकर्णीकाका बोलले, अरे बाबानो हे सेवाव्रत फार फार कठीण आहे. आमच्या डोक्यातून आश्रमाचे भूत जावे म्हणून त्यांनी आम्हाला सर्व रोगीजन दाखवून किळस निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु केला. अंथरुणाला खिळलेले रुग्ण, झाडलोट करणाऱ्या थकलेल्या आजीबाई आदी निराशाजनक चित्र दाखवून परावृत्त करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्याच दिवशी आश्रमातील एका वृध्द बाईंचे निधन झाले होते. तिथेच आम्हाला बसवले. या बाईंची अंतिम क्रिया कशी करायची या विंवचनेत आम्ही असून समाजसेवकांना बोलावून वेळ निभावून घ्यावी लागेल. अशातऱ्हेचे त्यांचे बोलणे सुरु होते. हे सर्व आम्हाला परावृत्त करण्यासाठी सुरु होते की, आमच्या ध्येयापासून आम्ही पळ काढतो काय? याची चाचपणी करण्यासाठी होते ते तेच जाणे. दिवसभर आश्रमात राहून तिथले कामकाज पाहून परतलो. आपसात विचारांची देवाण-घेवाण करुन परत एकदा उभयतांना आमची आमच्या कामाप्रती असलेली कळकळ व या प्रकारच्या उपक्रमाची सध्याच्या काळात असणारी निकड त्यांना समजावून देण्यात यश आले. एकदा त्यांना पटल्यावर त्यांनीही शक्य तेवढा सहकार्याचा हात दिला. यासाठी त्यांचे आम्ही ऋणी आहोत. संपूर्ण आश्रम फिरवून दाखवत असताना त्यांनी हेही सुचवले की एकादं वर्ष करुन पहा तुमच्या हातून हे सेवाव्रत निभावलं जाईल का याचा नीट अभ्यास करुनच निर्णय घ्या. झेपत नाही असे लक्षात आले तर सरळ बंद करुन अन्य उपक्रम चालू ठेवा. कारण वृध्दावस्था ही बालसुलभ निरागसता हरवलेलं दुसरं बालपणच असतं. असं आम्ही अनुभवत असल्याने सावधगिरीचा इशारा द्यावासा वाटतो. वर्तमान काळातील एक जटील सामाजिक गुंतागुंतीची समस्या सोडवण्यासाठी चाललेल्या तुमच्या धडपडीला आमच्या शुभेच्छा! श्री. बापट-कुलकर्णी काकांचा निरोप घेऊन आम्ही परतलो. शहरापासून दूर गैरसोयींचे आगर असलेल्या त्या माळरानावरचे सुप्त चैतन्य जागृत करुन समाजाचेच एक अंग, एकाकी उपेक्षित वृध्दमाणसांच्या उतारवयात आनंदाचा मळा

फुलवण्याच्या ध्यासाने आम्ही सहकारी झपाटून कामाला लागलो.

आजुबाजूच्या परीसरात एखादे झाडही नव्हते. रखरखीत माळ जमीनीवर निवारा शेडच्या बांधकामास सुधीर मुरकुंबी आणि मी (विजय मोरे) सुरुवात केली. प्रसंगी स्वतःही बांधकामात पाणी मारणे, दुपारच्या जेवणाचे डबे गवंड्यांसाठी घेऊन जाणे व त्यांच्याबरोबर माझीही पोटपूजा करत असे. साधारण एक वर्षभरात ३०X६० आकाराचे निवारा शेड उभे झाले. इलेक्ट्रीसीटीही नव्हती. आम्ही मानवतेच्या भावनेने समाजातील कुटुंबव्यवस्थेत होत असलेल्या उलथा-पालथीमुळे उपेक्षित वृध्द कुटुंब सदस्यांच्या जीवनात आनंदाचा मळा फुलवण्यासाठी धडपडत होतो. परीणामी आसमंतात वावरणाऱ्या विधायक सकारात्मक शक्ती आमच्या कार्यास प्रेरक झाल्या अशी माझी श्रध्दा आहे. काही ठळक ठळक प्रसंगांची नोंद करतो.

त्यावेळी केंद्रीय मंत्री असणाऱ्या कै. बाबागौडा पाटील यांनी आठ दिवसात इंडस्ट्रियल लाईनवरुन आश्रमात विजेची सुविधा करुन दिली. याकामी के.ई.बी.चे अधिकारी पालसर देबरड्डी सर यांनीही आपल्या बहुमोल सहकार्याचा हात दिला. आश्रम सुरु करुन सांभाळण्याचा प्रश्न मी आणि पत्नी मारीयानी पुढाकार घेऊन आश्रमास चालना दिली. आश्रमात प्रवेशणारे पहिले वृध्द होते मधुकर खाडीलकर नंतर लक्ष्मीबाई घोरपडे, पाठोपाठ अम्मा, मी आणि पत्नी गारीया मुक्कामास आलो. अशा तऱ्हेने शांताई वृध्दाश्रमाचा परीवार साकारु लागला. दर शनिवारी संध्याकाळी बेळगाव मुक्कामी थांबून रविवारी परत येत असे. आरंभी पाटील परीवारांनी मुख्य बांधकाम व दरमहा येणारा खर्च जवळपास ३५,०००/- रुपयांची जबाबदारी उचलली. पाच जणांच्या स्वयंपाका-पाणी आदी भोजन बनवण्याची व्यवस्था स्वतः लक्ष्मीबाई घोरपडे पार पाडीत पुढे काही काळानंतर स्वयंपाकाचा भार गोवा येथील एक स्वयंपाकी प्रभा यांनी सांभाळला. त्याचवेळी वर्तमानपत्रातील जाहिरात पाहून नागेश चौगुले यांनी आश्रमाचे व्यवस्थापन पाहण्याचे कार्य स्वीकारले. श्री. नागेश चौगुले हे रोज सकाळी येऊन संध्याकाळी जात असत. परंतु यात जा-ये करण्यातच बराच वेळ वाया जात असल्याचे लक्षात आल्याने चार दिवस आश्रमाचे कामकाज व तीन दिवस आपल्या मुला माणसात राहत. काही काळानंतर संपूर्ण वेळ आश्रमाच्या कामकाजास सरांनी वाहून घेतले. पंधरा एक दिवस किंवा महिन्यातून एक दिवस आपल्या मुलामाणसांकडे जाऊन येत. पुढे वयाच्या सत्तराव्या वर्षी चारचाकी गाडी चालवणे शिकले. यामुळे बाजारहाट, वृध्दमंडळींना दवाखान्यात नेणे-आणणे आदी कामे पार पाडणे सोयीस्कर झाले. या कामात मीही त्यांच्या बरोबरीने संपूर्ण जबाबदारी पार

पाडत होतो. सकाळी ६-३० वाजता सामूहिक प्रार्थना, ८-३० वाजता न्याहारी, १२-३० ला जेवण, ४ वाजता चहा, रात्री ८ वाजता जेवण असा सर्वसाधारण दिनक्रम सुरु होऊन एक शिस्तबध्द वळण आश्रमात सुरु झाले. या जडण-घडणीत सिंहाचा वाटा चौगुले सरांचा आहे. हे मी आदर पूर्वक नमूद करुन माझी त्यांच्याप्रती असणारी कृतज्ञता प्रकट करतोय.

माननीय श्री. बापट व कुलकर्णी काका बेळगाव भेटीवेळी आश्रम पाहण्यास आले. शहरापासून थोडा दूर असूनही सुरु तर केलात तरी इतक्या दूरवर येण्यास वृध्द मंडळी मिळणे तसे थोडे कठीणच तरीही आणखी एखादं वर्ष पहा नाही, तर सरळ बंद करुन इतर सामाजिक कार्यात लक्ष घाला असा अनाहूत सल्ला देऊन आम्ही नाऊमेद होतो की काय हे चाचपण्याचा त्यांचा या मागे हेतू होता काय? देव जाणे! परंतु आम्ही आमच्या वृध्दाश्रमाच्या योजनेवर ठाम होतो. पूर्ण विचाराअंतीच या योजनेचा भक्कम पाया घातला गेला होता. आश्रमाच्या जडण-घडणीचे पूर्ण अधिकार चौगुले सरांकडे पूर्णपणे सोपवले होते. आम्ही दोघे एक एक सुधारणा व आवश्यक सोयीसुविधा करत होतो. शांताई वृध्दाश्रमाची शांतपणे आपल्या ध्येयाकडे वाटचाल सुरु होती. निश्चित दिशेने! कुणाच्या सल्ल्याने माघार घेण्याचा विचार नव्हता. आम्ही प्रामाणिक तळमळ व सदहेतूच्या बळावरच हे धाडस केले होते. तेच आमचे पाठीराखे दैवत!

आश्रमाच्या प्रसिध्दीसाठी मंडळाच्यावतीने निरनिराळे कार्यक्रम आयोजीत करत असू. वृत्तपत्रांमध्ये चौगुले सर आपल्या लिखाणाद्वारे मंडळाविषयी लिहून जनतेला आवाहन करत असत. मी आणि महंमद कुन्नीभावी आश्रमातील घडामोडींच्या वार्ता वर्तमानपत्रात देत होतो. इ.स. २००० साली चार वृध्द मंडळी वास्तव्यास होती तेव्हा नायरस ग्रुप कडून पोर्टेबल टी.व्ही. भेट मिळाला. पत्रकार मंडळीही आमच्या सेवाभावी कार्यामुळे प्रभावीत होऊन 'शांताई वृध्दाश्रमाच्या' प्रसिध्दीसाठी कार्यरत झाली. परिणामी वेगवेगळ्या क्षेत्रातील सेवाभावी मंडळ, महिला मंडळ यांचा आश्रमास भेटी देऊन कामकाज जाणून घेऊन यथाशक्ती मदत करण्यास सुरुवात केली. लहान-मोठे देणगीदारही मदतीसाठी पुढे आले. वाढदिवस, विवाह समारंभासारख्या प्रसंगानिमित्तानेही काहीजण आपला वाटा देत होते. प्रसिध्द माध्यमात शांताई वृध्दाश्रमाबद्दल वाचून, ऐकून निवारा आश्रमाचे सेवक व बापट काका, कुलकर्णी काका आणि हरीभाऊ काका यांनी आपलाही वाटा सुपूर्द करुन सहभाग नोंदविला. श्री. कुलकर्णी काकांच्या पत्नीच्या नावाने भोजन कक्ष बांधला त्यासाठी त्यांनी एक लाख रुपये देणगी दिली. श्री. विनायक शंकर यांनी रुपये पन्नास

हजारांचे डायनिंग टेबल दिले. श्री. बापट काका व कुलकर्णी काकांनी त्यांच्या सल्ल्यानी नाऊमेद न होता आम्ही उभा करत असलेल्या वृध्द मंडळींच्या सेवाकार्याची दाद देऊन प्रशंसा करत पाठ थोपटली. आम्हाला शुभाशीर्वाद देऊन पुढेही आपले सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. आम्ही त्यांच्या या पाठिंब्यांनी भरुन पावलो. आमचा उत्साह द्वीगुणीत झाला.

वृध्दांची संख्या हळूहळू वाढत चालली वृध्द महिलाही होत्या. '३०X६०' च्या जागेतच सगळे एकत्रितच राहावे लागत असे. त्यांच्याबरोबर चौगुले सरही राहत असत.

आश्रमाचे चेअरमन विजय पाटील आपले मित्र जेठमल मेहता यांच्यासह नित्याप्रमाणे आले असता आश्रमाचे सेवाभावाने सुरु असलेले कार्य पाहून आनंद व्यक्त करुन पुरुषांसाठी वेगळी व्यवस्था करण्यासाठी दहा लाख रुपयांची भरीव देणगी देऊन आपला सहभाग नोंदविला. सुधीर मुरकुंबी यानीच ही जबाबदारी उचलून पुरुष विभागाच्या इमारतीचे बांधकाम सुरु केले. अनगोळ येथील एका परीवारानेही आश्रमात सुरु असणारे काम पाहून पाच लाख रुपयांचा चेक देऊन अनामिक राहणे पसंत केले. यासाठी मला त्यांच्या घरी बोलावून त्यांनी चेक सुपूर्द केला होता. त्यांच्या प्रसिध्दी पराङ्मुख वृत्तीने मीही मुग्ध झालो. आश्रमाच्या सेवाकार्यास मदत करणारी एक एक करुन दानशूर मंडळी पुढे येऊ लागली. याचा परीणाम आश्रमाचा पाया भक्कम होण्यात झाला. पुढे स्वतंत्र पानावर त्यांचा नामनिर्देश करत आहे.

या दानशूर मंडळींच्या मदतीने उभ्या राहिलेल्या पुरुष विभागाच्या इमारतीचा कार्यारंभ मा. श्री. मेहता कुटुंबीय, एस. पी. श्रीमती सोनिया नारंग, डॉ. एम्. आर. जाली, सौ. सीमा ठाकूर, राजेंद्र दोड्डण्णवर, डॉ. भट आदी मान्यवरांच्या हस्ते झाला.

पुढेही आश्रमातील सोयीसुविधांच्या पूर्ततेसाठी समाजातील दानशूर मंडळी आघाडीवर राहिली. अजूनही येत असतात.

मुख्य रस्त्यापासून आश्रमाकडे येणारा रस्ता कच्चा होता. त्यावेळी असणारे आमदार मनोहर किणेकर यांनी आमच्या विनंतीस प्रतिसाद देऊन डांबरीकरण केलेला पक्का रस्ता करुन देण्याचे महत्वाचे कार्य केले. आमदार कार्यकाल असेपर्यंत दरमहा पाचशे रुपये देणगी देत. तेव्हा खासदार असणाऱ्या माननीय बाबागौडा पाटील यांच्या प्रयत्नांनी सरकारी खर्चानी इंडस्ट्रियल लाईनवरुन एक महिन्यातच आश्रम परीसरासाठी वीजेची सोय करुन दिली. याकामी त्यांना के.ई.बी.चे एक्झीक्युटीव्ह इंजिनियर श्री. बी. एफ्. पाटील साहेब, एस. ओ. अधिकारी देवरेड्डी, एम. के. पाटील, सरस्वती आणि लेबरवर्क

करणारे कामगार या सर्वांचे भरपूर सहकार्य मिळाले. आश्रमास २४X७ वीजेच्या सोईमुळे परीसर प्रकाशमान झाला. आजसुध्दा एस. ओ. हाबेरी, दीपानंद व सर्व लाईनमन आश्रमाला आपले सहकार्य तत्परतेने देतात. आश्रमाच्या सेवाभावी कार्याची दखल घेऊन ते अशा रीतीने आपला आदरभाव दाखवत असतात अशाच माझ्या भावना आहेत.

तसेच आणखी एक महत्वाचे म्हणजे किणये येथील ''संगीत रत्न, महाराष्ट्र भूषण, बेळगाव भूषण'' अशा पुरस्कारांनी सन्मानित झालेले अखंड ४० वर्षाहून अधिक संगीत भजन गायन मोफत शिकविण्याची दिंडी समर्थपणे, प्रामाणिकपणे वाहणारे संगीतप्रेमी शंकर नारायण पाटील यांनी शांताई स्वर सुगंध भजन मंडळ, बामणवाडी अशा नावाने या आश्रमातील वृध्द महिलांना संगीताची कला आत्मसात करण्यात योगदान दिले आहे. यामुळे या आश्रमात एक भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. तसेच शंकर पाटील सर हे विनामूल्य भजन शिकवत असतात. त्यांचेही या आश्रमाला सहकार्य मिळत आहे.

आश्रमात असणाऱ्या वृध्दांच्या आरोग्याच्या काही तक्रारी निघाल्यास निरनिराळ्या डॉक्टर मंडळींकडे धाव घ्यावी लागे. आजकाल वैद्यकीय खर्चही बऱ्यापैकी वाढलेले आहेत आणि दिवसेंदिवस त्यात वाढच होत आहे. याबाबत आम्हा सहकाऱ्यांत चर्चाही होत असत. अशा परिस्थितीत माझ्या माध्यमातून केल्या गेलेल्या विनंतीस मान देऊन बेळगाव येथील सुप्रसिध्द के. एल. ई. हॉस्पिटल व जे.एन्.एम.सी. या संस्थानी आश्रमातील वृध्द मंडळीसाठी संपूर्ण मोफत उपचार सुविधा उपलब्ध करुन दिली. पंधरा वर्षापासून उपरोक्त संस्था व एन.एस.एस.च्या सर्व घटकांचे अमोल सहकार्य निरपेक्ष भावनेने देतात. डेंटल चेकअप, ई.एन.टी. आय. केअर, मेडीसीन, आयुर्वेदिक आदी शाखांचे विद्यार्थी आस्थेने रुग्ण वृध्दांची विचारपूस करुन योग्य ते उपचार करतात. त्यांच्या या सौजन्यपूर्ण सेवेनेच वृध्दांची प्रकृती सुधारण्यास लाभदायक परीणाम घडत असावा हे नमूद करुन आपली कृतज्ञता व्यक्त करतो.

मा. डॉ. प्रभाकर कोरे यांच्या नेतृत्वात के.एल.ई. व जे.एन्.एम्.सी., मराठा मंडळ, जैन कॉलेज ऑफ ग्रुप या संस्थांची सहकारी डॉक्टर मंडळी व कर्मचारी वर्गाच्या सेवाभावी कार्याला संस्थेतील वृध्द व सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने सलाम करतो. वरील संस्थांची उत्तरोत्तर भरभराट होवो अशा शुभेच्छा देतो. वृध्दाश्रमास तत्परतेने वैद्यकीय सेवा विनामोबदला देणाऱ्या डॉक्टर्स मंडळींची नामावली स्वतंत्र परिशिष्टात देत आहे.

वृध्दाश्रमाच्या कार्यामुळे प्रभावीत होऊन आजी माजी आमदार, खासदार प्रामुख्याने कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र राज्यातील मान्यवर भेट देऊन मदतीचा हात पुढे करतात. यामुळे

आश्रमात सोयी-सुविधा करण्याच्या कामाला चालना मिळते. वृध्दांच्या जीवनमानात सुधार येतो. स्थानिक सरकारी अधिकारी डी. सी., एसपी., आय.जी.पी. कॅन्टोनमेंट सी.ई.ओ. आदींचेही मोलाचे सहकार्य मिळते. त्यांच्या आश्रमास भेटीही असतात.

आश्रमाच्या शुभारंभापासूनच ''शांताई वृध्दाश्रमाचा'' जगन्नाथाचा रथोत्सव साजरा करत ओढत नेण्यासाठी समाजातील विविध घटकांचे सहाय्य मिळत असल्यानेच आम्ही हे सेवाभावी कार्य पेलण्यात यशस्वीपणे वाटचाल करत आहोत. करत राहू.

साधारण १५ एक वर्षापासून दैनंदिन गरजा भागविण्यासाठी दरमहा धान्य, भाजीपाला, कापडचोपड, भांडीकुंडी सह आर्थिक मदत देण्यात अजित बाळे, दिलीप चिटणीस, शशिकांत सिदनाळ, डॉ. अनिल पाटील, पद्मा मेडिकल्स, नागराज जाधव, राहुल केसरकर, नितीन खोत, कुलकर्णी, सायनाक, सिध्दार्थ हुंदरे, विनायक कासूर, मेहता, ह्रीत मचाडो, मत्तीकोप आदी मंडळी हातभार लावत असतात. काही वृध्द मंडळी एकादशी-द्वादशी साजरी करतात त्याचा जो काही खर्च होईल तो करण्यासाठी श्री. महेश पाटील यांनी कायमस्वरुपी ठेव एक लाख रुपये वडिलांच्या हस्ते दिली आहे. दरवर्षी देणगी देणारेही आहेत.

पंचवीस वर्षाच्या कालावधीत परीचीत अपरीचीत असे बरेच दानवीर आश्रमाचा हा जगन्नाथाचा रथ ओढण्याच्या यात्रेस हातभार लावण्यास सामील झाले. सगळ्यांची नोंद करुन दखल घेणे जमले नाही यासाठी मी दिलगिरी व्यक्त करतो. ''शांताई वृध्दाश्रमाचा'' हा संक्षिप्त धावता आढावा आहे याची, ज्यांचा नामोल्लेख नाही त्यांनी नोंद घेण्याएवढे मोठे मन करुन इतरांसाठी ते आदर्शव्रत असेल!

अशाच एका भेटीप्रसंगी 'निवारा वृध्दाश्रम' पुणे येथील समाजसेवक श्री. कुलकर्णी काका शांताई वृध्दाश्रमाचे व्यवस्थापन, स्वयंसेवक, आश्रमवासी वृध्द मंडळी व संचालक मंडळा बरोबर खेळीमेळीचे हंसतमुखाचे संबंध अवलोकन करुन प्रसन्न झाले. त्यांना अभिप्रेत असे शांताईचे आदर्शरुप पाहून मनोमनी खुष झाले. वरचेवर निरनिराळ्या निमित्ताने होत असणाऱ्या भेटीगाठींमुळे आमच्यात जवळीकीचे नाते संबंध तयार झाले होते. त्यामुळे ते मला 'बाबा' या टोपणनांवाने संबोधत. या खेपेस त्यांनी प्रांजळपणे, सांगितले 'बाबा मी हरलो! तू जिंकलास!' मला अभिप्रेत असणारे वृध्दाश्रमाचे मॉडेल शांताईत गवसले! माझी अखेर इथे या सेवाव्रताचा सुगंध दरवळत असणाऱ्या पवित्र जागेवर व्हावी अशी प्रामाणिक मनोकामना आहे. ती तू अव्हेरणार नाहीस अशी आशा करतो.' त्यांची ही मनोकामना फळली. पुणे येथील मुक्काम हलवून ते शांताईत दाखल

झाले. चौगुले सरांना एका अनुभवसंपन्न सेवाभावी हाताची जोड, साथ मिळाली. सर्व आश्रमवासीयानाही त्यांच्या अनुभवी मार्गदर्शनाची मदत झाली. पाच एक वर्षातच त्यांची अखेर शांताईत झाली. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचा ''सेवाभावी देह'' जे.एन्.एम्.सी.ला दान दिला. त्यांच्या जाण्याने आम्ही आश्रमवासी गहिवरलो. ही कुलकर्णी काकांच्या देहदानाच्या आदर्शापासून प्रेरणा घेऊन आम्हीही देहदानाचा प्रचार करत आहोत. परीणामी कित्येक जणांनी नेत्रदान, देहदान केले.

प्रार्थना हॉल बांधण्यासाठी काकांनी दहा लाख रुपये दिले होते. त्याची जबाबदारी शंभू शिंत्रे व सुधीर मुरकुंबी यांनी घेऊन हक वर्षात हॉल उभा करुन सज्ज केला. या कामात गोपाळ कुकडोळकर, एन. एस. चौगुले, मदनकुमार भैरप्पणवर, नागेश देसाई, प्रेमानंद गुरव, हेमंत भंडारी, जेठमल, मेहता, किशोरभाई, दिलीप चिटणीस, आर. डी. चौगुले, शिवाजी हंगिरगेकर, अशोक पाटील, अनुप जवळकर, मनोसीमठ, रमेश पाटील, मिलींद बेळगावकर, अजीत पाटील यांच्या सक्रीय सहकार्यामुळे लगबगीने काम पूर्णत्वास गेले.

प्रार्थना हॉलचे उद्‌घाटन श्री. मायकल लोंबो, गोव्याचे तत्कालीन गृहमंत्री आणि खासदार प्रभाकर कोरे, अविनाश पोतदार, श्री. धोंड काका व विनय पाटील यांच्या हस्ते झाले. संपूर्ण दिवसभर विविध कार्यक्रम सुरु होते. जे.एन.एम.सी., के.एल.ई. डेंटल कॉलेज, जैन कॉलेज आदींचे जवळपास दोन हजार विद्यार्थी यात सहभागी झाले होते. त्याचसुमारास आणखी एक इमारत उभी झाली. तीची जबाबदारी श्री. सतीश गौरगौंडा, संतोष ममदापूर, रोहित नाईक यांच्याकडे सोपवली. श्री. संतोष ममदापूर यांच्या रुपाने एक सच्चा समाजसेवक शांताईच्या परीवारात कायमस्वरुपी कार्यकर्ता म्हणून रुजू झाला. अशा सेवाभावी संचालकाच्या चोवीस तास उपलब्धतेमुळे आश्रमाचे कामकाज सुसुत्रता येण्यास पुरक होत आहे. या कार्यात सर्वश्री. संतोष ममदापूर, राजेन्द्र बन्सूर, महंमद कुन्नीभावी, वसंत बालिगा, विनायक बोंगाळे, अरुण पोटे, श्रीमती मारीया मोरे, गंगा पाटील, ताई, मलप्रभा पाटील, माधवी पाटील, सौ. प्रेमा पाटील, मेरी डिसोझा, जेन डिसोझा, लक्ष्मण तळवार, शंकर मेस्त्री, संजय हणबर, मारुती पाटील आदी सदस्यांनी कार्यक्रमाची व्यवस्था सांभाळण्यास बरेच परीश्रम घेतले.

वृध्द स्त्रियांची संख्याही वाढतच होती. त्यांची सोय असणारी शेड पत्र्याची असल्याने उन्हाळ्यात गरमीमुळे तिथे राहणे त्रासदायक होत असे. विजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संचालकांची बैठक होऊन आर.सी.सी. बांधकाम करण्याचे ठरले. आश्रमाकडे तर पैसा

शिल्लक नव्हता. पण म्हणतात ना की कोणतेही विधायक काम करण्याच्या संकल्पपूर्तीसाठी आपोआपच सहकार्याचे हात पुढे येतात. या कामाची जबाबदारी उचलून संकल्पपूर्तीस हातभार लावला. देणगीदारही पुढे आले. बघता बघता संकल्पपूर्ती झाली.

येथे विशेषतः नोंद घेण्यासारख्या दोन घटना सांगाव्याशा वाटतात. बांधकाम पुरे होईपर्यंत महिला वर्गांना आम्ही त्यांच्या नातेवाईकांकडे जाऊन राहण्यासाठी विनंती केली. पण कोणीही न जाता पुरुष विभागात गैरसोय सोसून राहून वेळ निभावली.

सदरहू बांधकाम करण्याचा मानसही नव्हता. मीही सिमल्याला गेलो होतो. पंधरा दिवसांनी परतणार होतो. माझ्या गैरहजेरीत चौगुले, संतोष ममदापूर, वसंत बालिगा, रेखा बाळेकुंद्री, महंमद कुन्नीभावी यांनी आश्रमातील व्यवस्था छान सांभाळून वरील कार्यातही लक्ष देत. बांधकामाचे डिझाईन मी सीमल्याहून परतण्यापूर्वीच शशिकांत चौगले यांनी तयार केले होते. अर्धेमुर्धे बांधकाम झाले असताना आश्रमात येऊन गेलेल्या एका व्यक्तीचा मला सिमला मुक्कामी फोन आला, सुखद धक्का देणारा. त्यांनी सांगितले अर्धेमुर्धे झालेले बांधकाम माझ्या आईच्या स्मरणार्थ पूर्ण करुन देतो. ही सेवेची संधी तुम्ही मला देण्याची कृपा करा. त्यांना संतोष ममदापूर यांना भेटण्यास सांगितले. एकूण खर्च रुपये पंचवीस लाखांचा होता. सुचनेनुसार त्यांनी संतोष ममदापूर व इतर संबंधीतांशी कामासंबंधी चर्चा करुन काम मार्गी लावले. जातीने लक्ष घालून शशिकांत यांच्याकडून काम पूर्णत्वास नेले. तयार झालेल्या वरच्या हॉलला ''कै. जनाई हॉल'' असे नामकरण करण्यात आले. या वास्तूचे शानदार उद्‌घाटन प.पू. प्रल्हाद वामनराव पै व पोलीस आयुक्त कृष्णभट यांच्या शुभहस्ते झाले. पू. वामनराव पै यांची हजारो भक्तमंडळी उपस्थित होती. याच समारंभात कै. सुरेश हुंदरे यांच्या स्मरणार्थ वृध्दांच्या भोजन व्यवस्थेतील गैरसोय दूर करण्यासाठी बांधवलेल्या डायनिंग हॉलचेही श्री. सिध्दार्थ हुंदरे यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी आर. डी. शानभाग, दिलीप चिटणीसही उपस्थित होते. हा सर्वच प्रकल्प पूर्णतेसाठी शशी चौगुले व आर. डी. शानभाग यांनी भरपूर परीश्रम घेतले.

वृध्द मंडळींसाठी आश्रमात वेळोवेळी काही कार्यक्रम होत असतात. त्यासाठी एखादे स्वतंत्र व्यासपीठ उभारावे असे वाटत होते. त्याचा पाठपुरावा संतोष ममदापूर करत होते तेव्हां श्री. विजय मजली यांनी सुचविले की विजय मोरे यांच्याबरोबर सामाजिक कार्यात हिरीरीनी सहभागी होणाऱ्या ज्येष्ठ समाजसेविका कै. श्रीमती शकुताई परांजपे यांच्या भावांनी भगिनी शकुताई यांच्या स्मरणार्थ काही भरीव असे उभारुया

असा मनोदय व्यक्त केला आहे तरी या संदर्भात विचारविनिमय व्हावा व शांताईत शकुताईंच्या कार्याची स्मृती जागवुया! हा विचार संतोष व मला पटल्याने, माझ्या बरोबरीने अखेरपर्यंत अपंग बंधूंच्यासाठी धडपडणाऱ्या ज्येष्ठ समाजसेविकेचे नावे व्यासपीठ उभा करुया.

एकदा निर्णय झाल्यावर मी आणि संतोष या कार्यासाठी धडपड सुरु केली. आमची मित्रमंडळी, परीचित यांच्याकडे व्यासपीठासाठी आयोगात येऊ शकेल असे सामान-सुमान असेल ते जमवण्याच्या मागे लागलो. लोखंडी पोल, पाठोपाठअनगोळ येथील हरी मंदिर या प्रसिध्द देवस्थानाकडून श्री कृष्णा माने व संतोष यांनी पत्रे मिळविले. आवश्यक असे बांबू सातशे नग फॉरेस्ट अधिकाऱ्यांनी देऊन आपला सरकारी सहभाग नोंदविला तर गजानन घाडी यांनीही तीनशे नग बांबू सुपूर्द केले. उर्वरीत कार्यपूर्ती सर्वश्री. संजय कुलकर्णी, बर्डे परिवार, राजू गोकाक, गंगाधर पाटील, किरण गावडे, मंगेश इलेक्ट्रीकल्स आणि पी.डब्ल्यू.डी. इंजिनियरसाहेब यांच्या सहयोगाने पार पडली.

एका शुभदिनी डॉ. प्रभाकर कोरे, ए.सी.पी. नारायण बरमणी, विजय मजली, प्रसन्ना घोटगे, नागेश चौगुले, सांबरा विमानतळ संचालक राजेशकुमार मौर्य, विजय पाटील, ए.सी.पी. चंद्राप्पा यांच्या हस्ते शांताईच्या हजारो हितचिंतकांच्या उपस्थितीत उद्‌घाटन सोहळा साजरा झाला. या छानशा वास्तूतील शकुताई परांजपे हॉलमध्ये असणाऱ्या व्यासपीठास माजी आमदार व्ही. वाय. चव्हाण व्यासपीठ असे नामकरणाने सोहळा संपन्न झाला.

परदेशात वास्तव्यास असणाऱ्या श्रीमती भाग्यश्री यांना फेसबुकवर मा. श्री. आर. डी. शानभाग व श्रीमती शांताबाई गिजरे यांच्या सौजन्याने शांताई आश्रमाच्या परीसरात केलेले पेव्हर ब्लॉकचे काम पहाण्यास मिळाले. या कामामुळे त्या प्राभावित झाल्या व आपले दिवंगत वडील कै. श्री. शांताराम वेसणे यांच्या नावे गो शाळा बांधण्यास सहकार्य केले. पुढे भारतात येऊन गो शाळेचे उद्‌घाटन आपल्या आईच्या हस्ते केले. गो शाळेत आज कपिला व सुकरी या नावाने दोन गाई आहेत. त्यांची देखभाल सर्वश्री. वझेकाका, दीपक गणाचारी, यल्लाप्पा तळवार, सुरेश मुलीमनी, फकीराप्पा हे करतात.

श्री. वसंत बालिगा यांचे स्नेही श्री. संजय मेहता वृध्दाश्रमाच्या भेटीसाठी येत असत. किचनमध्ये असणाऱ्या गैरसोयीं पाहून त्यांनी सुसज्ज अशा किचनची व्यवस्था उभारण्याचा आपला मनोदय बालिगा यांचेकडे बोलून दाखविला आणि आमच्या होकाराने आनंदी होऊन नेहमीप्रमाणे संतोष ममदापूर यांच्याकडे जबाबदारी सोपवून झटपट अधुनिक

किचन उभे केले. सौ. माणिकलाल यांच्या स्मरणार्थ उभारलेल्या या किचनचे उद्घाटन श्री. संजय मेहता, सतीश मेहता, आई सविता मेहता परीवारांतर्फे सर्व सदस्यांना आमंत्रण देऊन करण्यात आले. तारीख होती १०-११-१९.

समाजात जे जे विधायक कार्य करुन समाजाच्या उन्नतीसाठी झटत असतात त्यांना या कार्यात सहकार्य करुन आर्थिक पाठबळ देण्यात "जयभारत फौंडेशन" सहाय्य करत असते. मा. श्री अशोक हुंबरवाडी यांनी श्री. कालकुंद्रीकर, अशोक आयर्नचे एच. आर. यांना आश्रमास भेट देण्यास सांमून जरुर ती मदत करण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी फिरुन आश्रम पाहिला. शिस्तबध्द व्यवस्था पाहून त्यांनी फौंडेशन मिटींगमध्ये महिला वर्गासाठी हॉल बांधण्याचा प्रस्ताव ठेवून मंजुरी मिळविली. या कामासाठी पंधरा लाख रुपयांचा निधी फौंडेशनने उपलब्ध करुन दिला. संतोष ममदापूर आणि मी हॉल उभारण्याच्या कार्यात आम्हाला सर्वश्री चैतन्य कुलकर्णी, अजित कुलकर्णी, गोपाळ कुकडोळकर, प्रेमानंद गुरव, दीपक गोजगेकर यांनीसुध्दा देणगी देऊन काम पूर्ण करण्यास सक्रीय सहभाग नोंदविला. त्यांच्या या आस्थापूर्वक मिळालेल्या सहकार्याने आम्ही सुखावलो.

सौ.व श्री. कालकुंद्रीकर यांच्यासह जयभारत फौंडेशनचे सदस्य व आश्रमवासी मोजक्याच आमंत्रितांच्या उपस्थितीत सत्यनारायणाची पूजा करुन महिला वर्गाच्या हॉलचे शानदार उद्घाटन झाले.

या कामासाठी सारे श्रेय या कामास चालना देणार आमचे स्नेही श्री. किरण निप्पाणीकर व आर्थिक जबाबदारीचा भार उचलणारे मा. श्री. हुंबरवाडीकर कुटुंबियांचे सहाय्य मोलाचे मिळाले.

आश्रमाचे चोख काम व टापटीप, स्वच्छता पाहून हिंडलगा जेलचे सुपरीटेंडेंट श्री. कृष्णकुमार यांनी परीसरात 'मेडिटेशन हॉल' बांधण्यासाठी शिफारस करुन भगवान गौत्तम बुध्दाची ध्यानस्त असलेली मुर्ती भेट दिली. आज सदर गौत्तम बुध्दाची मुर्ती मेडिटेशन हॉलमध्ये विराजमान आहे. हिंडलगा जेलमध्येही बौध्द मुर्ती बसवून तेथील वातावरण पॉझीटीव्ह होऊन कैद्यांना चांगले वळण लागावे या शुध्द हेतूने बुध्दमुर्ती स्थापन केली. काही कैदी रोज मेडीटेशन करत असतात. असे त्यांनी सांगितले.

उपरोक्त मेडिटेशन हॉल मी आणि संतोष ममदापूर यांनी नको असलेले साहित्य निरनिराळ्या ठिकाणाहून जमवून मेडिटेशन हॉल उभारला. शांताईचे चेअरमन साहेबांच्या कन्या राजश्री रायबागी, मलप्रभा विजय पाटील, विठ्ठल पाटील, विनायक पाटील, विकी पाटील, परशराम पाटील, अमित पाटील, गौत्तम मोरे, शरत मोरे, मारीया मोरे, धनश्री

पाटील यांच्या संकल्पनेनुसार, आश्रमाचे चेअरमन श्री. विजय पाटील यांच्या ५३व्या वाढदिवसाचे औचित्य साधून हॉलचे उद्घाटन मोठ्या थाटात करण्यात आले. हा समारंभ संजय अनगोळ, व्ही. एम. हिरेमठ, एन. व्ही. नरसण्णावर, आयुक्त जगदीश, दिलीप कुरुंदवाडे यांनी विशेष लक्ष घालून संपन्न करण्यासाठी प्रयत्न केले.

भक्कम पायावर उभा केलेला हा मेडिटेशन हॉल सभोवताली असणाऱ्या लहान-मोठ्या फॅक्टरींचे मालक, चालक आणि शैक्षणिक संस्थांच्या विद्यार्थ्यांबरोबरच इतर नागरिकांसाठीही खुला ठेवला आहे. जैन कॉलेजचे एक योग गुरुंची सुध्दा शास्त्रशुध्द शिषण देण्यासाठी नेमणूक केलेली. ज्यांना ज्यांना या सुविधेचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी जरुर यावे. सर्वांचे स्वागत आहे.

कोरोनाच्या पहिल्या लाटेपासूनच मी आणि माझे कुटुंब शांताईमध्ये राहण्यास आलो. लॉकडाऊनच्या काळात पोलीस खाते, पत्रकार, डॉक्टर्स व परीचारीका यांच्या न्याहरी व भोजनाची व्यवस्था आश्रमातून करत असू. रोज साधारण ५० ते १०० जणांची व्यवस्था होत असे. आश्रमाच्या समोर असणाऱ्या मोठ्या काजूच्या झाडाखाली वाढत असू. गावकरी यांना जवळ करत नसत. भीतीमुळे टाळत असत. आम्ही मात्र आमचे कर्तव्य पार पाडण्यात समाधान पावत होतो हे जोखमीचे काम आम्ही बाळव्वा, मलप्रभा आणि रेखा या सहकारी महिलांच्या अथक सहकार्यामुळे निभाऊ शकलो त्यांचे मी खास आभार मानतो.

दुसऱ्या लाटेत मात्र मी स्वतःच कोरोना पॉझीटिव्ह झालो. स्कोर होता १६-कोविड केअर सेंटरमध्ये ॲडमिट झालो. या काळात माझे स्नेहीसोबती श्री. विजय पाटील, संतोष, वसंत बालिगा, दिलीप कुरुंदवाडे, माझे कुटुंबीय सर्व हितचिंतक आणि आश्रमवासी आजी-आजोबा यांच्या विशेष सेवासुश्रुषेमुळे मी सुखरुप बरा होऊ शकलो, खरा परंतु बघता बघता आश्रमातील सर्व वृध्दमंडळी कोरोना ग्रस्त झाली. आठ-एक दिवसात ७ जणांनी या जगाचा निरोपही घेतला.

या कठीण काळात मुलगा ॲलन मोरे, पत्नी मारीया, मुलगी शरल यांनी संपूर्ण आश्रमाची व्यवस्था जबाबदारीने निभावली. मला कसलीही माहिती न देता मुकपणे सारेकाही सांभाळले याचा मला अभिमान आहे. कोरोनामुक्त होऊन परतल्यावर सर्व समजले. या काळात विजय आणि विजया पाटील रोज आश्रमाकडे येऊन कमी जास्त पहात असत. वसंत बालीगा रोज सर्वांचे चेकअप करुन जात. संतोष रोज बेळगावहून नाश्ता व जेवण पोहचवत असत. डॉ. भूषण सुतार, किणये पी.एच.सी. सेंटरचे अशोक

कोरे आणि टीम रोज येऊन चेकअप करुन औषध पाण्याची व्यवस्था करत श्री. संजय डूमगोळ, टीएचओ, डीएचओ हे आश्रम आपला समजून कसलीही अडचण जातीने लक्ष देऊन दूर करत. यामुळे लवकरच माझ्यासह सर्वजण कोरोनामुक्त होऊ शकलो. आश्रम पूर्वपदावर आला.

सर्वात महत्वाचे कार्य श्री. नागेश चौगुले, रेखा बाळेकुंद्री, मारिया मोरे, बाळव्वा मुनीनमनी, वज्रा हडेद, रेखा कणबरकर, मलप्रभा, सुरेश कुंद्रेमणी, मलूप्पा तलवार, दत्ता घोरपडे, दिपक गणाचारी, महादेवी पाटील, मेरी डिसोझा, ॲलन मोरे, शरल मोरे, अरुण पोटे, महमद कुन्नीभावी, संजय वालवालकर, शंभू शिंत्रे, गंगाधर पाटील, रवि साळुंखे, शंकर नावगेकर आणि कुटुंबीय वसंत बालिगा, संतोष ममदापूर, निसार तहशिलदार, संजय कोलकार, अशोक, स्मशानध्ये शंकर महाप्पा, संजय मोरे आणि सर्व माझे सहकारी तसेच बामणवाडी गावातील सर्व पंच मंडळी व गावकरी, पोलीस खाते सर्व सरकारी अधिकारी, देणगीदार, पत्रकार तसेच नजरचुकीने कोणाचे नाव राहिले असल्यास त्यांची मी माफी मागतो आणि सर्व हितचिंतक सर्व बेळगावकर आणि कुणाला या कार्यात सहभागी व्हायचे आहे त्यांनी मनःपासून सहभागी व्हावे. त्यांचे आश्रमधील सर्व वृध्दांच्यावतीने व संचालकांच्यावतीने हार्दिक हार्दिक स्वागत करतो.

आश्रमाच्या बाजूलाच असणाऱ्या बामणवाडी, कुट्टलवाडी, जानेवाडी, किणये, संतिबस्तवाड इतर सर्व गावांच्या लोकांना आणि बेळगाव परिसरातील नागरिकांना एक सुसज्ज मंगलकार्यालय शांताईमध्ये उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. या ठिकाणी अल्पदरात विवाह व इतर समारंभ करण्याची सोय असेल. समाजामधील काही दुर्बल घटकांना मंगल कार्यालयाचे भाडेही परवडत नाही अशांना मोफत समारंभ करण्याची सोय दिली जाईल. या कार्याला देणगीदारांचे सहकार्य नक्कीच लाभेल. तसेच कोणतेही कार्य करत असताना आपले महत्वाचे सल्ले, मार्गदर्शन आवश्यक असून आम्ही नक्कीच त्यांचे मनःपासून स्वागतच करु.

धन्यवाद !

**शांताई परीवार**

*  *  *



बामणवाडी येथील विद्यार्थी दरवर्षी आश्रमात
स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी येतात.




स्वत:चे आयुष्य आश्रमासाठी खर्ची घातलेल्या
व्यवस्थापक नागेश चौगुले यांचा आम्हाला अभिमान आहे.



आश्रमाच्या कार्याची दखल घेऊन तत्कालिन
एसपी हेमंत निंबाळकर यांनी चेअरमन विजय पाटील यांचा सन्मान केला.



सन्माननीय डॉ. प्रभाकर कोरे,
एसीपी एन. व्ही. बरमनी आदी मान्यवर एका कार्यक्रमप्रसंगी